**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नागपूर दौऱ्यावर, रेशीम बाग आणि दीक्षाभूमीवर आदरांजली अर्पण करणार

- पंढरपुरातल्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जिर्णोद्धाराचं काम आषाढी एकादशीपर्यंत पूर्ण करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- वाढत्या तापमानामुळे राज्यातल्या सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे शिक्षण विभागाचे आदेश

**आणि**

- IPL वर सट्टा लावणाऱ्या ५ जणांना जालन्यातून अटक

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुढीपाडव्यानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. रेशीमबागेतल्या स्मृती मंदिरात ते डॉ केशव बळिराम हेडगेवार यांना आदरांजली वाहतील. त्यानंतर दीक्षाभूमीलाही भेट देऊन ते आदरांजली वाहणार आहेत. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या विस्तार केंद्राची पायाभरणी होणार आहे. याठिकाणी ते नागरिकांना संबोधित करणार आहेत. प्रधानमंत्री नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडच्या ड्रोनसाठीच्या धावपट्टी सुविधेचं उद्घाटन करतील.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, वेबसाइट, प्रधानमंत्री

कार्यालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे यूट्यूब चॅनल आणि न्यूज ऑन एआयआर या ॲप वर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. आकाशवाणीवरून रात्री ८ वाजता प्रादेशिक भाषांमध्ये कार्यक्रमाचं प्रसारण होईल.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. चैत्र शुक्लदी, उगादी, चेट्टीचंद, नवरेह, चेराओबा या सणांनिमित्त देखील त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय नववर्षाची सुरुवात असलेले हे सण भारताची सांस्कृतिक विविधता दर्शवतात आणि सामाजिक एकता वाढवतात असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी गुढीपाडव्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर येत असलेला हा पहिला गुढी पाडवा सर्वांनी उत्साहाने साजरा करावा असं त्यांनी म्हटलं.

**<><><><><><>**

पंढरपुरातल्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जिर्णोद्धाराचं काम आषाढी एकादशीपर्यंत पूर्ण करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्णन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामाची पाहणी मुख्यमंत्र्यांनी आज केली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. पंढरपूर कॉरिडॉरचं काम सर्वांना विश्वासात घेऊन करण्यात येईल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री..**

**<><><><><><>**

तुळजापूर मंदिर विकास आराखड्याला शासनाने तत्वतः मान्यता दिली असून महत्वाच्या कामांसाठी तातडीनं निधी वितरित केला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी आज तुळजापूर विकास

आराखड्याचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या आराखड्याची दोन वर्षांत अंमलबजावणी व्हावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

याविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे धाराशिवचे वार्ताहर देविदास पाठक…

**होल्ड - व्हीसी**

**<><><><><><>**

जनतेला अभिमान वाटेल अशा प्रकारचे संभाजी महाराजांचं स्मारक संगमेश्वर, वढू आणि तुळापूर या ठिकाणी उभारण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. या स्मृतीस्थाळाच्या विकासासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असल्याचं आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. संभाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त वढू तुळापूर इथं आयोजित कार्यक्रमांत ते बोलत होते. पुणे जिल्ह्यातील वढू तुळापूर इथं छत्रपती संभाजी महाराजांच्या 336 व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना आज अभिवादन करण्यात येत आहे. समाधी स्थळावर छत्रपती संभाजी महाराजांना शासकीय मानवंदना देण्यात आली.

**<><><><><><>**

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांची वेळ सकाळच्या सत्रात करण्याचे निर्देश शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी आणि शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिले आहेत. त्यानुसार प्राथमिक शाळांसाठी सकाळी ७ ते ११.१५ आणि माध्यमिक शाळांसाठी सकाळी ७ ते पावणेबारा अशी वेळ निश्चित केली आहे.

**<><><><><><>**

रत्नागिरी रेल्वे स्थानकातल्या प्रशस्त वातानुकूलित प्रतीक्षा कक्षाचं आज उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन झालं. कोणत्याही वर्गातून प्रवास करत

असलेल्या रेल्वे प्रवाशांना तासाला ५० रुपये देऊन या प्रतीक्षा कक्षाच्या सुविधेचा लाभ घेता येणार आहे.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून रत्नागिरी रेल्वेस्थानकाच्या विकासासाठी ४० कोटी रुपयांचा निधी दिला असून, गरजेनुसार आणखी पाच ते दहा कोटी रुपर्यंतचा निधी देण्याचं आश्वासन सामंत यांनी उद्घाटनानंतर दिलं. रायगडमधलं रोहा, रत्नागिरीतलं चिपळूण आणि खेड, तसंच सिंधुदुर्गातलं कुडाळ अशा एमआयडीसीला लागून असलेल्या रेल्वेस्थानकांच्या विकासासाठीही येत्या महिन्याभरात सामंजस्य करार केला जाईल, असंही सामंत यांनी सांगितलं.

<><><><><><>

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी बुद्धगया इथल्या महाबोधी महाविहाराचं व्यवस्थापन पूर्णतः बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्याची मागणी केली आहे. यासाठी आठवले यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांची भेट घेतली. सरकारनं १९४९ चा महाबोधी मंदिर कायदा रद्द करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

<><><><><><>

मुंबईतले पोलीस उपायुक्त सुधाकर पठारे यांचं आज तेलंगणात अपघाती निधन झालं. ते प्रशिक्षणासाठी हैदराबादला गेले होते. देवदर्शनासाठी श्री शैलम इथून नागर कुर्नुलकडे जात असताना त्यांच्या गाडीची एका ट्रकसोबत धडक झाली. या अपघातात पठारे यांच्यासह त्यांच्या नातेवाईकाचाही मृत्यू झाला.

सुधाकर पठारे हे भारतीय पोलीस सेवेच्या २०११ च्या तुकडीतले अधिकारी होते. पठारे यांनी पंढरपूर, अकलूज, कोल्हापूर शहर आणि राजुराचे यासह मुंबई महानगर क्षेत्रात विविध ठिकाणी काम केलं आहे.

<><><><><><>

जालना जिल्ह्यात आयपीएल क्रिकेट सामन्यांवर सट्टा लावणारे ४ बुकी आणि एका सट्टेबाजाला चंदनझिरा पोलिसांनी आज अटक केली. आयपीएल मध्ये चेन्नई सुपर किंग्ज विरुध्द रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातल्या सामन्यावर सट्टा लावल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. पोलिसांनी या कारवाईत  मोबाईल, लॅपटॉप आणि इतर साहित्यासह एकूण ८ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सचा सामना मुंबई इंडियन्सशी होणार आहे. हा सामना अहमदाबादमध्ये होणार असून संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरू होईल. मुंबई इंडियन्स संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

<><><><><>

खड्डेमुक्त महाराष्ट्र घडवण्याच्या दिशेनं खड्ड्यांच्या तक्रारीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागानं खड्डे तक्रार निवारण प्रणाली विकसित केली आहे. गुगल प्ले स्टोअर वरून PCRS ॲप डाउनलोड करून नागरिक या प्रणालीच्या माध्यमातून तक्रार करू शकतात. नागरिकांच्या मोबाईल वर आलेल्या OTP च्या माध्यमातून नोंदणी करून ‘रजिस्टर फीडबॅक’ ऑप्शन द्वारे ही तक्रार होऊ शकते.

<><><><><>

धुळे शहरातल्या औद्योगिक वसाहतीतल्या एका डेअरीतून पोलिसांनी अडीचशे किलो भेसळयुक्त पनीर जप्त केलं. या कारवाईत साधारणपणे ६० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या डेअरीचा खाद्य परवान्याचा अर्ज कागदपत्रांच्या कमरतेमुळं नामंजूर करण्यात आला होता.

<><><><><>

भंडारा जिल्हयाजवळच्या नवेगाव - नागझिरा व्याघ्र प्रकल्पात कॅमेरा ट्रॅपच्या माध्यमातून युरेशीयन पाणमांजर या दुर्मिळ प्राण्याची कोका वन परिक्षेत्रात पहिली

छायाचित्रणात्मक नोंद झाली. याआधी महाराष्ट्रातले निसर्ग शास्त्रज्ञ मारुती चित्तमपल्ली यांनी १९७८ मध्ये जिल्ह्यात या प्रजातीची शेवटची नोंद केली होती.

**<><><><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या नरडाणा-बोरविहीर रेल्वे मार्गाच्या कामाला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी विरोध दर्शवला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या शेतकरी रेल्वे संघर्ष समितीनं, आज शेतकऱ्यांनी भूसंपादित जमिनींचा ताबा द्यायला नकार देत काम बंद पाडलं. या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या बागायती जमिनींना कोरडवाहू जमिनीचा दर दिला जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. याशिवाय हेक्टरी मोबदला देण्याऐवजी, जमिनींच्या उपयोगितेच्या दृष्टीनं योग्य मापदंडाच्या आधारावर मोबदला द्यावा, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केला आहे.

**//<><><><><>//**